**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ०७ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानच्या भूमीवरचे आणि पाकव्याप्त काश्मीरमधले ९ दहशतवादीतळ तिथल्या नागरी आणि लष्करी आस्थापनांना धक्का न लावता उद्ध्वस्त, सर्वपक्षीय नेत्यांकडून कारवाईचे कौतुक.**
2. **कोळसा वापर आणि वाटप करण्याच्या सुधारित ‘शक्ती’ योजनेला केंद्रीय मंत्रीमंडळाच्या अर्थ व्यवहार विषयक समितीची मान्यात.**
3. **गडचिरोलीत खनिकर्म विषयक अभ्यासक्रमासाठी गोंडवाना विद्यापीठाचे परदेशी विद्यापीठांबरोबर करार.**
4. **यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारात वर्धा जिल्हा परिषद राज्यात प्रथम.**

---

**ऑपरेशन सिंदूर**

**पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधे राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर मधे दहशतवाद्यांचे ९ तळ उद्ध्वस्त झाले आहेत. परराष्ट्र व्यवहार विभागाचे सचिव विक्रम मिस्री, भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी दिल्लीत झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पहाटे एक वाजून पाच मिनिटांनी सुरु झालेली ही मोहीम दीड वाजता संपली. गेली ३० वर्षं पाकिस्ताननं पुरवलेल्या पायाभूत सुविधांच्या आधारे इथं दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिलं जात होतं. पाकिस्तानच्या कोणत्याही नागरी वस्तीला किंवा लष्करी आस्थापनांना धक्का न लावता ही मोहीम फत्ते झाल्याचं त्यांनी सांगितलं. या कारवाईतून पाकिस्तानचे दहशतवादाशी लागेबांधे उघड झाले असल्याचं विक्रम मिस्री म्हणाले.**

***(होल्ड बाईट - विक्रम मिस्री 40 सेकंद)***

***पहलगाम आतंकवादी हमले की जांच से पाकिस्तान के साथ आतंकवादियों के संपर्क उजागर हुए हैं। रेजिस्टेंस फ्रंट द्वारा किए गए दावे और लश्कर-ए-तय्यबा***

*से ज्ञात सोशल मीडिया हैंडल द्वारा इसको रिपोस्ट किया जाना इसकी पुष्टि करता है। चश्मदीद गवाहों और विभिन्न जांच एजेंसियों को उपलब्ध अन्य सूचनाओं के आधार पर हमलावारों की पहचान भी हुई है। हमारी इन्टेलिजेन्स ने इस टीम के योजनाकारों और उनके समर्थकों की जानकारी जुटाई है। इस हमले की रूपरेखा भारत में सीमापार आतंकवाद को अंजाम देने के पाकिस्तान के लंबे ट्रैक रिकॉर्ड से भी जुड़ी हुई है, जिसके लिखित और स्पष्ट दस्तावेज उपलब्ध है।*

या मोहिमेबाबात माहिती देणारं दृक्श्राव्य सादरीकरण या पत्रकारपरिषदेत देण्यात आलं. ऑपरेशन सिंदूर नंतर केंद्रीय मंत्रिमंडळाची बठक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं झाली. मंत्रिमंडळ सदस्यांनी या मोहिमेबद्दल पंतप्रधानांचं अभिनंदन केलं आणि त्यांच्यानेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी दुपारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांना ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती दिली. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने उद्या सर्वपक्षीयबठक बोलावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर तीन देशांचा आगामी दौरा स्थगित केला आहे. पंतप्रधान मोदी या महिन्यात क्रोएशिया, नॉर्वे आणि नेदरलैंड्सच्या दौऱ्यावर जाणार होते. या मोहिमेनंतर देशाच्या उत्तर भागातल्या अनेक विमानतळांवरची व्यावसायिक वाहतूक सेवा बंद ठेवण्यात आली आहे. राजस्थान, पंजाब आणि जम्मूकाश्मीरमधे विमानतळ बंद ठेवण्यात आले आहेत. सुरक्षा यंत्रणा सतर्क असून सीमावर्ती भागातल्या शाळा बंद ठेवण्याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आहे.

---------------------------------------

प्रतिक्रिया

भारतीय संरक्षण दलानं राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' चं सर्व पक्षीय नेत्यांनी कौतुक केलं आहे.पहलगाममध्ये देशातल्या निरपराध बांधवांच्या निर्घृण हत्येला भारतानं दिलेली प्रतिक्रिया म्हणजे ऑपरेशन सिंदूर आहे ,असं केंद्रीय गृहमंत्रीअमित शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय लष्कराचं कौतुक केलं. जगानं दहशतवादाबाबत झीरो टॉलरन्स धोरण दाखवलं पाहिजे असं मत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीव्यक्त केलं आहे. आपल्याला भारतीय लष्कराचा अभिमान आहे असं लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी समाज माध्यमावर

म्हटलं आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस दहशतवादाविरोधात कोणतीही निर्णायक कारवाई करण्यासाठीलष्कर आणि सरकारच्या पाठीशी ठामपणे उभी आहे असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कारवाई ला अभिमानाचा क्षण असे संबोधले

*(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस २० सेकंद)*

*अतिशय प्रिसीजनं पद्धतीनं एअर स्ट्राइक करून दहशतवाद्यांचे नऊ अड्डे पूर्णपणे ध्वस्त करण्यात आलेले आहेत आणि यावेळी ते ध्वस्त करतानासह संपूर्ण शूटिंग अ‍ॅवेलेबल असल्यामुळे कोणाला पुरावा मागण्या करता स्कोप देखील राहिलेला नाही. मला असं वाटतं की सर्व भारतीयांकरता अभिमानाचा असा हा दिवस आहे.*

केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी देखील 'ऑपरेशन सिंदूर'चं कौतुक केलं आहे.

----------------------------------------

मॉक ड्रिल

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान दरम्यान तणावाच्या पार्श्वभूमीवर, देशात ठिकठिकाणी आज, मॉक ड्रिल म्हणजे युद्ध सज्जता सराव करण्याचे आदेश केंद्रीय गृह मंत्रालयानं दिले आहेत.

----------------------------------------

सुधारित ‘शक्ती’ योजना

कोळसा वापर आणि वाटप करण्याच्या सुधारित ‘शक्ती’ योजनेला ,प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालच्या अर्थ व्यवहार विषयक मंत्रीमंडळ समितीने मान्यता दिली आहे. केंद्र, राज्य आणि स्वतंत्र औष्णिक वीज केंद्रांना कोळसा पुरवठा करण्यासाठी या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे.नव्या शक्ती धोरणामुळे औष्णिक वीज केंद्रांना कोळशाचं नियोजन करणं शक्य होईल, असं मंत्रीमंडळ समितीने म्हटलं आहे.

----------------------------------------

खनिजसंपन्न गडचिरोली

खनिजसंपन्न गडचिरोली जिल्ह्यात, खनिकर्म विषयाचे विविध अभ्यासक्रम उपलब्ध होणार आहेत. स्वायत्त 'विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था' स्थापन करण्याबाबत गडचिरोलीचं गोंडवन विद्यापीठ आणि ऑस्ट्रेलियाचं कार्टीन विद्यापीठ यांच्यात

आज या संदर्भातल्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. मुंबईत राजभवन इथं राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा करार झाला.

----------------------------------------

बावनकुळे

नागपूर येथील शासकीय मुद्रणालयाच्या तसेच शहर पुरवठा कार्यालयाच्या काही जागा, नागपूर विधानसभेच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असून, या जागांचे हस्तांतरण करावे. दोन्ही कार्यालयांनी पर्यायी जागा शोधून प्रस्ताव सादर करावा. मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने त्याला अंतिम स्वरूप मिळेल. असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या या बठकीत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते.

----------------------------------------

यशवंत पुरस्कार

प्रशासकीय व्यवस्थापन आणि विकास कार्यातील उत्कृष्ट योगदानासाठी वर्धा जिल्हा परिषदेला राज्य शासनाच्या वर्ष 2023-24 च्या यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कारांतर्गत राज्यातून पहिल्या क्रमांकाचा तर नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर पंचायत समितीला राज्यात व विभागातही पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. अनुक्रमे 30 लाख आणि 20 व 11 लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. विजेत्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी अभिनंदन केले आहे. ग्राम विकास विभागाने 6 मे 2025 रोजी शासन निर्णय निर्गमीत करून यशवंत पंचायत राज अभियान सन 2023-24 साठी राज्यातील अत्युत्कृष्ट जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना विभाग व राज्य स्तरीय पुरस्कार जाहीर केले आहेत.

----------------------------------------

डॉ.धनराज डहाट निधन

डॉ.धनराज डहाट यांचं आज निधन झालं. विविध विषयांवर त्यांनी चाळीस पुस्तकांचे लेखन केले असून पंधरा ग्रंथांचे संपादन केले होते. परखड आणि अभ्यासू वक्ते म्हणून त्यांचा नावलौकिक होता.भारत सरकारच्या एन.एस.एस.ओ मधून राजपत्रित अधिकारी म्हणून ते सेवानिवृत्त झाले होते. नागपूर विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर पदव्युत्तर विभागात ते अंशकालीन

प्राध्यापकही होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिगर्भ तत्वज्ञानाचा त्यांच्यावर प्रचंड प्रभाव होता. त्यांच्या साहित्याचा गौरव म्हणून अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले.

---------------------------------------

हवामान

विदर्भात आज आणि उद्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नऊ आणि दहा तारखेला देखील बहुतांश जिल्ह्यांमध्ये असंच हवामान कायम राहणार आहे. आज भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर वगळता विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलक्या ते अत्यंत हलक्या स्वरूपाच्या पर्जन्यमानाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान, सातत्याने वादळी पर्जन्यमान असल्यामुळे विदर्भात अकोला जिल्ह्यात आज सर्वाधिक कमाल तापमान 40° चाळीस पूर्णांक तीन अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं तर नागपुरात 39 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान आहे.

---------------------------------------